अच्छे शब्दों के प्रयोग से बुरे लोगों का भी दिल जीता जा सकता है।

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार २३ फेब्रुवारी २०२५ | अंक ७६ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# मराठी साहित्य संमेलनात छावा ची धूम!
# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही चित्रपटाची मोहिनी

## महाराष्ट्रातील संतांनी देशाला अध्यात्मिक उर्जा दिली

भाषा समाजात जन्म घेतात. पण समाजाच्या निर्मितीसाठी महत्वाची भूमिका बाजवत असते. मी जेव्हा मराठीचा विचार करतो तेव्हा मला संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग आठवतो. माझ्या मराठीची बोलू कौतुके, परि अमृतासेही पैजासे जिंके. मराठी भाषा अमृताहून गोड आहे. त्यामुळे मराठीबाबत माझे प्रेम आहे. ते तुम्हाला माहीतच आहे. भारताला अध्यात्मिक उर्जाची गरज होती तेव्हा महाष्ट्रातील संतांनी ती पूर्ण केली. मराठीतील अनेक संतांनी भक्ती आंदोलनातून समाजाला नवीन दिशा दिली. समृद्ध दलित साहित्य मराठी भाषेने देशाला दिले. विज्ञान साहित्य दिले. नवीन विचार, नवीन प्रतिभा महाराष्ट्राने दिली

सध्या देशभर छावा चित्रपटाची चर्चा सुरु आहे. या चित्रपटामुळे छत्रपती संभाजी महाराज यांचा इतिहास कोट्यवधी लोकांपर्यंत गेला. या चित्रपटाने अनेक विक्रम तयार केला. छावा चित्रपटाबद्दल प्रत्येकाला आकर्षण वाटत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही छावा चित्रपटाने मोहिनी घातल्याचे दिसून आले. नवी दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना त्यांनी त्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, छावाची धूम सुरू आहे. संभाजी महाराजांच्या शौर्याचा परिचय शिवाजी सावंत यांच्या कादंबरीनेच करून दिला आहे. मुंबईने मराठीसह हिंदी सिनेमालाही नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. भारत जगातील सर्वात प्राचीन सभ्यतेपैकी एक आहे. साहित्य समाजाचा आरसा आहे. साहित्य समाजाचे पथप्रदर्शक आहे. त्यामुळे साहित्य संमेलनासारख्या कार्यक्रमाची देशात महत्त्वाची भूमिका असते. गोविंद रानडे, हरी नारायण आपटे, आचार्य अत्रे, सावरकर यांनी आदर्श निर्माण केले आहे. साहित्य महामंडळ ही परंपरा पुढे नेईल अशी आशा करतो, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. संघामुळे मराठी शिकलो दिल्लीत आयोजित अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठीतून बोलण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, मी



तुमच्या प्रमाणे मराठी भाषा बोलू शकत नाही. परंतु नवनवीन मराठी शब्द शिकण्याचा आणि बोलण्याचा मी नेहमी प्रयत्न करत आलो. आज तर जागतिक मातृभाषा दिवस आहे. त्यामुळे मराठी साहित्य संमेलनासाठी तुम्ही दिवस पण चांगला दिवस निवडाला. माझ्यासारख्या लाखो लोकांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने देशासाठी जगण्याची प्रेरणा दिली.

# संतोष देशमुख हत्येप्रकरणी ग्रामस्थ उपोषणावर ठाम; सरकारला २५ फेब्रुवारीचा अल्टीमेटम

केज : उपोषणापासून गावकऱ्यांना प्रवृत्त करण्यासाठी आलेल्या मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांनी गावाकऱ्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी ग्रामस्थांच्या उपोषणाला पाठींबा दर्शवीला आहे. दरम्यान, उपोषण टाळायचे असेल तर चार दिवसांत सर्व मागण्या मान्य करा, असा अल्टीमेटम ग्रामस्थांनी आज सकाळी झालेल्या बैठकीनंतर प्रशासनास दिला. मनोज जरांगे पाटील यानी आज सकाळी ११ वाजता मस्साजोग येथे देशमुख कुटुंबिय आणि समस्त गावकऱ्यांची भेट घेतली. उपोषणापासून प्रवृत्त करण्यासाठी जरांगे यांनी देशमुख कुटुंबीय आणि ग्रामस्थांसोबत तब्बल २ तास सर्वांशी संवाद साधला. गुन्हेगारांना पळून जाण्यासाठी मदत करणारे पोलीस कर्मचारी- अधिकारी आणि आसरा, गाड्या आणि पैसा पुरविणाऱ्यांचा या प्रकरणात सहभाग आढळूनही अनेक जणांना सहआरोपी करण्यात आले नाही, याबाबत मनोज जरांगे पाटील आणि ग्रामस्थांनी नापसंती व्यक्त केली. तसेच प्रशासनाच्यावतीने देशमुख कुटुंबियांची एखाद्या मंत्र्यांनी भेट घ्यावी. त्यांना आधार आणि विश्वास द्यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली



# भिवंडी हादरलं! तरुणीचं भावासह अपहरण करुन सामूहिक बलात्कार

भिवंडीमधून धक्कादायक बातमी समोर आली आहे, भिवंडीत एका २२ वर्षीय तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीचा भाऊ आणि रिक्षा चालक यांना मारहाण करत पीडित तरुणीवर अत्याचार करण्यात आला आहे. या प्रकरणात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, एकाला अटक करण्यात आली आहे. घटनेबाबत अधिक तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

घटनेबाबत अधिक माहिती अशी की, भिवंडीमध्ये एका बावीस वर्षांच्या मुलीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला आहे. या घटनेनं खळबळ उडाली आहे.पीडित तरुणीचा भाऊ व रिक्षा चालक यांना मारहाण करून पीडित तरुणीवर बलात्कार करण्यात आला. भिवंडीतल्या बागे फिरदोस परिसरातून तरुणीचं भावासह अपहरण करण्यात आलं, त्यानंतर नागाव परिसरातील झाडाझुडपात या तरुणीवर सामूहिक अत्याचार करण्यात आला.आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यानंतर फातिमा नगर परिसरात देखील एका पिकप बोलेरो गाडीत पीडितेवर अत्याचार करण्यात आला. या घटनेनं खळबळ उडाली आहे. या प्रकरणी आधी तालुका पोलीस ठाण्यात सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला,

# संपादक बालासाहेब फड यांची परळी तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड

बीड : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने तालुका पातळीवरील नवीन अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून, परळी तालुका अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार तथा संपादक बालासाहेब फड यांची निवड झाली आहे. या नियुक्तीमुळे परळी तालुक्यातील पत्रकारितेला नवीन दिशा मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त



होत आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे व शेख रिझवान यांनी सदरील निवड जाहीर केली आहे. नवनियुक्त परळी तालुका अध्यक्ष बालासाहेब फड यांनी आपल्या प्रतिक्रिया देताना सांगितले की, तालुका आणि शहर पातळीवर लवकरच नवीन सभासद नोंदणी करून सक्षम कार्यकारिणी जाहीर केली जाईल. पत्रकारांच्या हितासाठी व संघटनाच्या बळकटीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील राहू. असे त्यांनी सांगीतले. बालासाहेब फड यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून उत्स्फूर्त स्वागत होत असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पत्रकारितेच्या प्रगतीसाठी त्यांचे नेतृत्व मोलाचे ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# धारूर - तेलगाव रोडवर दुचाकी अडवूनतिघांनी केला तलवारीने हल्ला दुचाकीस्वार गंभीर जखमी

धारूर : धारूर येथील गणेश नडगिरे हे १९ फेब्रुवारी संध्याकाळी धारूर - तेलगाव रोडवरील श्रावणी पॅलेस च्या जवळ रस्त्याने मोटरसायकलवर जात असताना अचानक तीन जणांनी येऊन तलवारीने वार करून जखमी केले. जखमीला ग्रामीण रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी लातूर येथे हलवण्यात आले. तर आरोपीला तात्काळ अटक



करण्यात पोलिसांना यश आले. अशपाक खान मोहम्मद शेख उर्फ गुड्डु, उस्मान खान मोहम्मद शेख, बबलु खान मोहम्मद अशी आरोपींची नावे असून ते धारूर तालुक्यातील गोपाळपूर ग्रामपंचायत हद्दीतील संभाजीनगर येथील आहेत. त्यातील दोन जणांनी तलवारीने हाताच्या पंजावर वार केले तर तिसऱ्या व्यक्तीने लाताबुक्यान ने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. जखमीला धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी लातूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोपींवर धारूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्ह्य नोंद करण्यात आला आहे. धारूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे, उपनिरीक्षक बाबासाहेब भवर सह पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ आरोपीचा शोध घेऊन तिन्ही आरोपीला अटक करून २१ फेब्रुवारी रोजी धारूर येथील न्यायालयामध्ये हजर करण्यात आले आहे.

# रिचार्ज वाल्या ताईंच्या खात्यावर २५ खोक्यांचा टाकलाय बॅलन्स, लवकरच देणार पुरावे

## सूरज चव्हाणांचे ट्विट अन् अंजली दमानिया यांचा त्रागा अन् आकांड तांडव

मुंबई : राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करण्यासाठी रिचार्ज वाल्या ताईच्या खात्यावर २५ खोक्यांचा बॅलन्स टाकण्यात आला आहे. काही काम न करता वर्षाला १५ देश फिरणाऱ्या व अडीच कोटी टॅक्स भरणाऱ्या स्वयंघोषित समाजसेविका ताई, तुमचा रिचार्ज कुणाच्या माध्यमातून झाला आहे ते लवकरच पुराव्यासहित उघड करणार, असे ट्विट केल्यानंतर हे ट्विट स्वतः वर ओढून घेत तथाकथित समाजसेविका अंजली दमानिया यांनी प्रचंड त्रागा करत सोशल मीडियावर संताप व्यक्त करून आकांड तांडव केल्याचे दिसत आहे. सुरज चव्हाण यांच्या या ट्विट नंतर अंजली दमाने यांनी मला प्रचंड राग आला असल्याचे म्हटले असून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी माजी सर्व बँक खाते तपासावी व त्यावर कुठलीही बेहिशोबी दमडी तरी आहे का हे तपासावे. मी लढते म्हणून माझा छळ करणार आहात का असा सवाल उपस्थित केला आहे. मात्र यावेळी नेट कऱ्यांनी मात्र अंजली दमानिया यांना चांगलेच धारेवर धरल्याचे दिसत आहे. काहीही व्यवसाय न करणाऱ्या अंजली दमानिया वर्षाला अडीच कोटी टॅक्स कसा काय भरू शकतात असा प्रश्न काहींनी उपस्थित केलाय. तर विविध नेतेमंडळींवर बिनबुडाचे व निराधार आरोग्यच उत्पन्न करणाऱ्या अंजली दमान्यांवर एक आरोप



झाला तर इतकी मिरची लागण्याचे काय कारण असाही सवाल अनेकांनी उपस्थित केला आहे. काही जणांनी आपण अंजली दमानिया यांच्या पाठीशी असल्याचे बोलले आहे तर, सुरज चव्हाण यांनी आपल्या ट्विटमध्ये कोणाचेही नाव घेतले नव्हते मात्र तरी ते ट्विट अंजली दमानिया यांना बरोबर लागले. याचाच अर्थ रिचार्ज वाल्या ताई कोण ते महाराष्ट्राला कळले असेही मत अनेकांनी व्यक्त केले आहे. दरम्यान अंजली दमानिया ह्या केवळ प्रसिद्धीसाठी आरोप करून एखाद्या प्रकरणांमध्ये एन्ट्री घेतात, त्यानंतर त्यांचे हेतू साध्य झाले की त्या प्रकरणातून गुपचूप एक्झिट घेतात आणि नंतर असेच दुसरे मोठे हाय प्रोफाईल प्रकरण शोधण्यामध्ये व्यस्त होतात, असा आरोप त्यांच्यावर याआधीही धनंजय मुंडे यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांनी केलेला आहे. दुसरीकडे अंजली दमानिया यांनी मागील दोन महिन्यांमध्य अर्धवट माहितीच्या आधारे निराधार व खोटे आरोप केल्याचे याआधी उघड झालेले आहे. तर दुसरीकडे अंजली दमानिया यांच्या संदर्भात सुरज चव्हाण यांनी २५ कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचा केलेला आरोप व त्यावरून ते पुराव्यांसह खुलासा करणार असल्याचे सूरज यांनी बोलले असून आता सुरज चव्हाण पुढे याबाबत काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

# थोडा अंधार हवा आहे

संत जनाबाईंच्या अभंगवाणीतील मआत्माविष्कारफ हे त्यांचं सौंदर्यसंपन्न अंग लक्षणीय ठरतं. लोकपरिवर्तनाला साहाय्यभूत अशी त्यांची अभंगवाणी सर्वार्थानं अभंग ठरली. महाराष्ट्रात महाराष्ट्र धर्म जागवण्यासाठी संतवाणी बहरत राहिली. शतकानुशतकं तिनं जागर घालून चैतन्याची स्फुल्लिंगं चेतवत ठेवली. ममुक्ताई जनाईची इथं ओठांवर ओवी।फ अशी साक्षही देऊन गेली. मानवी जीवनातील भय, असुरक्षितता, अस्थैर्य व अपराधीपणाची भावना नष्ट व्हावी यासाठी स्त्री संतांनीही लोकजागराची गंगा गावोगावी नेली. संत जनाबाईंच्या अभंगवाणीतील मआत्माविष्कारफ हे त्यांचं सौंदर्यसंपन्न अंग लक्षणीय ठरतं. लोकपरिवर्तनाला साहाय्यभूत अशी त्यांची अभंगवाणी सर्वार्थानं अभंग ठरली. ममी तो नामयाची दासी। जगी ठाऊक सर्वांशी।।फ आपल्या आयुष्यात आलेल्या ऋणकर्त्यासंबंधीचा कृतज्ञताभाव ती व्यक्त करते. आपल्या या आत्माविष्कारातून जनाई निरक्षर असल्याचं लीनतेनं सूचित करते. मात्र प्रसंगी परखड बोलही बोलून बंडखोर बनते. एक मस्त्रीफ म्हणजे ममाणूस!फ या नात्यानं नेटानं उभं राहण्याची मआत्मनिर्भर वृत्तीही दाखवते. निढळाचा घाम गाळून, उपसलेल्या अतीव कष्टानं व्याकूळ होऊन, अखंड अवहेलनेचं हलाहल रिचवून जनाईनं हे स्वातंत्र्य स्वकर्तृत्वानं मिळवण्यातही तिचं वेगळेपणच ध्यानी येतं. खूप काही सांगून जातं. डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी। हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा। आता मज मना कोण करी। पंढरीच्या पेठे मांडियले पाल। मनगटावरी तेल घाला तुम्ही।। जनी म्हणे देवा झाले मी मवेसवाफ। निघाले केशवा घरी तुझे।। परमेश्वर प्राप्तीसाठी अतिशय मआर्तफअसलेली संत जनाबाई ज्यावेळी आपलं मआर्तफ पुरवण्याचं मसार्थफस्वातंत्र्य प्राप्त करून घेण्यासाठी शिष्टाचाराचे सारे संकेत पार उखडून टाकते. लौकिकातून अलौकिकाकडे स्वतःचा प्रवास ती व्यभिचाराच्या दृष्टान्तातून मोठ्या धिटाईनं दर्शवते. भौतिकातील सर्व व्यवहार सोडून स्वबळावर दुर्दम्य आत्मविश्वासानं, आत्मनिर्भरतेनं पांडुरंगाकडे निघालेली संत जनाबाई इथं दिसते. तिच्या अंतरीची पराकोटीची विठ्ठलभेटीची आचच तिला मआत्मलक्षीफ बनवते. आत्यंतिक प्रेमजिव्हाळ्यानं जनाई तिच्या विठ्ठलाला हृदयी बंदिस्त करते. मधरिला पंढरीचा चोर। गळा बांधोनिया दोर। हृदय बंदिखाना केला। आत विठ्ठल कोंडला।।फ असं आपण आपल्या आराध्याला-विठ्ठलाला युक्तीनं कसं बंदिस्त केलं. या विजयी अभिनिवेषानं जनाई आपली नामी युक्तीही सांगते. पांडुरंग नामजप। हेचि माझे महातप।। असा नाममहिमा गातगात जनाईची भावभक्ती कृतीतून उमलत जात



बीड - जिप प्रा.शा .दिपेवडगाव ता .केज येथे शिवजयंती निमिचे औचित्य साधून दि.१९ फेब्रु २०२५ रोजी सकाळी ९वा मा . आदित्य जीवने जिप मुख्य कार्यकारी अधिकारी उएज बीड नूतन कार्यकुशल उत्तम प्रशासक यांच्या संकल्पनेतून बीड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रातील मिशन जरेवाडी शिक्षण गुणवता विकास अभियान समाजोपयोगी उपक्रमास सामाजिक बांधिलकी म्हणुन व कै.हरिभाऊ कांबळे व कै . कालवश जनाबाई हरीभाऊ कांबळे यांच्या स्मरणार्थ विविध स्पर्धा, गुणवत्ता,शालेय विद्यार्थ्यांना लेखन, वाचन साहित्याचे वाटप. कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गेल्या १० वर्षापासून हा उपक्रम संजय उजगरे आणि कमल संजय उजगरे यांच्या संकल्पनेतून उपक्रमाचे आयोजन करण्यात येते

# मराठवाड्यात ट्युशन इंडस्ट्री फोफावली!

ट्युशनविना देदीप्यमान यश! मराठवाड्यात असलेल्या अशा परिस्थितीतही ट्युशन न लावता देशातील सर्वात महत्त्वाची समजली जाणारी व ङ्गआयआयटीफ्ला प्रवेश देणारी पहिली पायरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जेईई ॲडव्हान्स परीक्षेत नांदेड व परभणी जिल्ह्यँतील विद्यार्थ्यांनी कुठलीही शिकवणी न लावता भर भक्कम गुण मिळविले आहेत. कुठलीही ट्युशन न लावता तुम्हाला देशातील सर्वात मोठे मोठे स्पर्धात्मक परीक्षेतही यश मिळविता येते, असा संदेश त्या यशस्वी विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाजाला दिला आहे. नांदेड येथील अमेय भावसार या विद्यार्थ्यांने जेईई मेन्स ॲडव्हान्स परीक्षेत ९८.०६% टाईल तर परभणी येथील हर्षद मुळे या विद्यार्थ्याने ९९.६३ % टाईल एवढे गुण मिळविले आहेत. राजस्थान, दिल्ली, तेलंगणा, आंध्र प्रदेश या राज्यांत असलेल्या ङ्गट्युशन इंडस्ट्रीफ्ने मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली, जालना, बीड या जिल्ह्यांत पाय रोवले आहेत. या ठिकाणी वेगवेगळ्या शाखा काढून पालक व विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याचे काम या ङ्गट्युशन इंडस्ट्रीफ्ने चालविले आहे. यामुळे मात्र महाविद्यालयात विद्यार्थ्यांची संख्या रोडावली आहे. महाविद्यालयात ङ्गट्युशन इंडस्ट्रीफ्ला मदत म्हणून नावापुरतीच उपस्थिती दाखवली जात आहे. डॉक्टर किंवा इंजिनीयर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या प्रमाणात मराठवाड्यात दोन वर्षांसाठी स्थायिक होत आहेत. हे सर्व ठीक असले तरी या प्रकारांमुळे मराठवाड्यात मात्र महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या प्रकरणी मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री, मुख्य सचिवांनी लक्ष देणे गरजेचे आहे.



आपल्या मुलांनी शिकावं व खूप मोठं व्हावं ही प्रत्येक पालकांची इच्छा असते. त्याखातर पालक मुलांच्या शाळा, कॉलेज व ट्युशनच्या शिक्षणासाठी धडपडत असतात. पूर्वीच्या काळात मुलांना ट्युशन लावणे म्हणजे मुलगा ङ्गढफ आहे, असा समज होता; परंतु आता तो समज पूर्णपणे पुसला गेला आहे. मुलांना ट्युशन असेल तरच तो काहीतरी शिकू शकेल व पुढे जाईल असे चित्र संपूर्ण मराठवाड्यात निर्माण झाले आहे. त्यामुळे देशातील सर्वच प्रकारच्या ट्युशन इंडस्ट्रीने मराठवाड्यात पाय रोवले आहेत; परंतु या ट्युशन इंडस्ट्रीच्या माध्यमातून मराठवाड्यात पालकांची कशाप्रकारे दिशाभूल व आर्थिक फसवणूक होत आहे हे कोणाच्याही लक्षात येत नाही. विशेष म्हणजे या ट्युशन इंडस्ट्रीमुळे राज्यातील सर्वच जिल्ह्यातून मराठवाड्यात ट्युशनसाठी मुले प्रवेश घेत आहेत. यामधून गुन्हेगारी देखील वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे. नांदेडमध्ये अलीकडेच एका पर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा दिवसाढवळ्या गर्दीच्या ठिकाणी चाकूने भोसकून खून झाल्याने हे प्रकरण चांगलेच तापले होते. विशेष म्हणजे खून करणारे तीनही आरोपी हे अल्पवयीन म्हणजेच १७ वर्षांचे होते. ते देखील बाहेर गावातील; परंतु ट्युशनच्या निमित्ताने नांदेडमध्ये स्थलांतरित झालेले आहेत. हिंगोलीचे खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या संस्थेतील एका मुख्याध्यापकावर दहावीच्या मुलीला पोलीस ॲकॅडमीत भरती करण्याचे आमिष दाखवून अतिप्रसंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. हा प्रकार नांदेड जिल्ह्यातील तामसा पोलीस स्थानक हद्दीत घडला. सदरील मुख्याध्यापक फरार असून पोलीस त्या मुख्याध्यापकाचा शोध घेत आहेत. एकीकडे शिक्षण शिकविण्याच्या नावावर शाळा व महाविद्यालयात शिक्षणाचा बट्ट्याबोळ झालेला दिसून येत आहे. सध्या बारावीच्या परीक्षांना प्रारंभ झाला असल्याने पर जिल्ह्यातील विद्यार्थी नांदेड, परभणी, लातूर व हिंगोली या जिल्ह्यातून परीक्षा देत असल्याचे समोर आले आहे. ट्युशन इंडस्ट्रीने विद्यार्थ्यांना प्रवेश देत असताना त्यांच्या महाविद्यालयाची सोय देखील करून दिलेली आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नाशिक, चंद्रपूर, नागपूर, गोंदिया अशा वेगवेगळ्या शहरातील विद्यार्थी मराठवाड्यात कोचिंग इंडस्ट्रीमध्ये प्रवेश घेऊन शिकत आहेत. शिक्षणाच्या या पवित्र क्षेत्रात मराठवाड्यात मात्र अलबेल आहे. एकीकडे महाविद्यालयातील प्राध्यापकांना शासनाकडून लाखो रुपयांचा पगार मिळत असताना त्यांचे काम मात्र शून्यावर आले आहे. त्यांचे काम ट्युशन इंडस्ट्री पार पाडत आहे. ही जमेची बाजू म्हणावी की, पालकांसाठी धोक्याची घंटा म्हणावी, असाच प्रश्न उपस्थित होत आहे. नांदेडमध्ये ट्युशनच्या नावाखाली अनेकांनी वेगवेगळे व्यापार थाटले आहेत. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या देखील वाढलेली असल्यामुळे नको ते गैरप्रकार देखील मूळ धरत आहेत. काही दिवसांपूर्वी नांदेडच्या आनंद नगर चौर रस्त्यावर झालेल्या खून प्रकरणानंतर भाईगिरी तसेच दादागिरी मोठ्या प्रमाणात वाढली असल्याचे दिसून येत आहे. डॉक्टर व इंजिनीयरचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हजारोंच्या संख्येमध्ये विद्यार्थी व पालक नांदेडमध्ये बस्तान मांडत आहेत; परंतु त्यापैकी केवळ पाच ते सात टक्के विद्यार्थी व पालकांनाच त्यामध्ये यश मिळत आहे. ही टक्केवारी पाहिली तर पालक व विद्यार्थ्यांची या ट्युशन इंडस्ट्रीकडून मोठ्या प्रमाणात दिशाभूल होत असल्याचेही स्पष्ट होत आहे. शेवटी प्रत्येक विद्यार्थी व पालकांना आशा असते. त्यामुळे या आशेवरच ही मंडळी महाराष्ट्राच्या कानाकोपरांतून नांदेडमध्ये स्थलांतरितहोत आहेत.

# शपथ घेऊन कॉपीमुक्तपरीक्षा होणार का?

तज्ज्ञ व पात्रताधारक शिक्षक असून सुद्धा विद्यार्थ्यांना खासगी शिकवणीची गरज आहे का? याचा विचार होणे आवश्यक आहे. त्यात कायम विना अनुदान शाळांचे वाढते प्रमाण ते सुद्धा पात्रता असून तुटपुंजा पगारावर शिक्षकसेवक म्हणून सेवा करावी लागत असली तरी त्यांना भविष्याची चिंता कायम आहे. पात्रता समान असली तरी कायमस्वरूपी शिक्षकाला रुपये पन्नास हजारांपेक्षा जास्त पगार आणि त्याच ठिकाणी कंत्राटी शिक्षक म्हणून ग्रामीण भागात रुपये चार हजार पगार दिला जातो. तो सुद्धा वेळेवर मिळत नाही. आजच्या परिस्थितीचा अभ्यास केल्यास प्राथमिक विभाग ते पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी रुपये चार हजार ते रुपये तीन लाखांपेक्षा जास्त पगार घेणारे अध्यापक आहेत. तरीपण असे प्रकार कसे होतात याचा सखोलपणे अभ्यास होणे आवश्यक आहे. तरच खऱ्या अर्थाने कॉपीमुक्त परीक्षा होतील. महाराष्ट्र राज्यातील दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी कॉपीमुक्त अभियान राबविण्याचा एक चांगला निर्णय महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतला आहे. कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी परीक्षा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी परीक्षेत कॉपी न करण्याची शपथ घेतली आहे. कॉपीमुक्त अभियानाचा मूळ उद्देश विद्यार्थ्यांमध्ये कॉपी न करण्याची सवय निर्माण करणे होय. एक चांगले पाऊल आपल्या राज्यातील शिक्षण मंडळाने घेतले आहे असेच म्हणावे लागेल. मात्र त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्यासाठी केवळ विद्यार्थी नव्हे तर अध्यापक व पालकांनी या कॉपीमुक्त अभियानात सहभागी व्हावे. तरच राज्यात कॉपीमुक्त अभियान यशस्वी होईल. अलीकडच्या काळातील परीक्षांचा विचार केल्यास परीक्षेतील गैरप्रकार थांबविण्यासाठी कॉपीमुक्त अभियान का राबविण्यात आले याचा विचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने आपल्या राज्यात नऊ विभागीय मंडळामार्फत दहावी आणि बारावीच्या परीक्षा घेतल्या जातात. फेब्रुवारी- मार्च २०२५ ची बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू झाली असून दहावीची (२१ फेब्रुवारी) परीक्षा कालपासून सुरू झाली आहे. बारावीच्या पहिल्या पेपरला राज्यात कोकण, मुंबई व कोल्हापूर विभाग सोडून इतर सहा विभागांत ४२ केंद्रांवर विद्यार्थ्यांनी कॉपी केल्याचे प्रकार घडले आहेत. आतापर्यंत सर्वात जास्त कॉपी केस छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) विभागामध्ये झाले आहेत. मग सांगा कॉपीमुक्त अभियानाचे झाले काय? अशावेळी ताबडतोब कारवाई होणे आवश्यक आहे. जी कारवाई केली असेल त्याला वर्तमानपत्रांमध्ये ठळकपणे प्रसिद्धी दिली पाहिजे. म्हणजे असे प्रकार पुढे होणार नाहीत. महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. त्यासाठी परीक्षा कॉपीमुक्त होण्यासाठी विद्यार्थ्यांना कॉपी न करण्याची शपथ घेण्यात आली असून कॉपी प्रकरणे उघडकीस आली आहेत. म्हणजे कॉपीमुक्त अभियानाचा नेमका अर्थ काय? याचा विचार राज्यातील सुजाण नागरिकांनी करणे गरजेचे आहे. परीक्षेच्या अगोदर परीक्षा मंडळाच्या आदेशानुसार दहावी आणि बारावीच्या बोर्डच्या परीक्षेत परिपूर्ण अभ्यास करूनच सामोरे जाईन असे वचन परीक्षार्थीने घेतले आहे. मी उत्तीर्ण होण्यासाठी परीक्षेत कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणार नाही किंवा परीक्षेपूर्वी गैरमार्गाचा विचारही करणार नाही. जर कोणी गैरमार्गाचा विचार करत असेल तर त्यास गैरमार्गापासून परावृत्त करेन असे वचनबद्ध विद्यार्थी झाले आहेत. तसेच परीक्षेला सामोरे जाताना परीक्षा मंडळाच्या सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे वचन घेतले आहे. त्याचप्रमाणे मी सातत्याने अभ्यास करेन व प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करेन. परीक्षेमध्ये आत्मविश्वासाने, निर्भीडपणे, तणावविरहित सामोरे जाईन व चांगल्या गुणाने उत्तीर्ण होऊन माझ्या शाळेचे, आई-वडिलांचे व गुरुजनांचे नाव उज्ज्वल करेन, अशी शपथ प्रत्येक विद्यार्थ्यांनी घेतली आहे.

# फ्रोजन शोल्डर...

वैधकीय भाषेत या वेदनांना ॲडेसिव्ह कॅप्सूलायटिस म्हटले जाते. प्रत्येक सांध्याच्या बाहेर एक कॅप्सूल असते. फ्रोजन शोल्डर समस्येमध्ये हीच कॅप्सूल कडक होते. खांद्याची हालचाल केल्यावर ह्या वेदना हळूहळू सुरु होतात आणि पूर्ण खांदा जाम होतो. बरेचदा गाडी चालवता चालवता किंवा काही घरगुती काम करता करता अचानक या वेदना सुरु होतात. एखादी व्यक्ती गाडी चालवत असेल आणि मागच्या जागेवरील सामान घेण्यासाठी मागे हात फिरवला तर खांदा हलवूच शकत नाही, असे लक्षात येते. हे फ्रोजन शोल्डरचे लक्षण असते. मानेच्या कोणत्याही दुखण्याला फ्रोजन शोल्डर समजले जाते पण तसे नाही. काहीवेळा त्याला आर्थ्ररायटिस समजण्याची चूक केली जाते. त्यासाठी योग्य हाडाच्या डॉक्टर चा सल्ला घेतलेलं कधी पण चांगल. इजा किंवा धक्का लागल्याने होणार्या प्रत्येक वेदना म्हणजे फ्रोजन शोल्डर नाहीत. ही एक स्वतंत्र आरोग्यसमस्या आहे. ही समस्या खूप लोकांना भेडसावते. निदान आणि उपचार - लक्षणे प्राथमिक तपासणीत खांदे आणि हात यांच्या काही खास जागांवर दाब देऊन वेदनेची तीव्रता ओळखता येते. त्याशिवाय एक्स-रे किंवा एमआरआय तपासणी करण्याच्या सल्लाही दिला जातो. उपचारांची सुरुवात ही समस्या किती गंभीर आहे हे पाहून केली जाते. वेदनाशामक औषधांच्या मदतीने वेदना कमी करण्याचा प्रयत्न केला जातो, जेणेकरून रुग्णाला खांदे हलवता येतील. वेदना कमी झाल्यानंतर फिजिओथेरेपी सुरु केली जाते. यामध्ये हॉट आणि कोल्ड कॉम्प्रेशन्स पॅक्स दिले जाते. त्यामुळे खांद्यांची सूज आणि वेदना यामध्ये आराम पडतो. अनेकदा रुग्णांना स्टिरॉईडस देण्याची गरज भासू शकते. अर्थात अगदी अपरिहार्य स्थितीत ते दिले जातात; अन्यथा नुकसानच होते. काही परिस्थितींमध्ये लोकल ॲनेस्थेशिया देऊन खांदे हलवले जातात. त्याशिवाय शस्त्रक्रियेचा पर्याय वापरावा लागतो. हेही लक्षात ठेवा - खांद्यांच्या वेदनांकडे दुर्लक्ष नको. सततच्या वेदना होत असतील तर डॉक्टरी सल्ला अवश्य घ्यावा.घरीच उपचार करत बसू नये आजार जास्त बळन्याची शक्यता नाकारत येत नाही. वेदना खूप जास्त असतील तर हात डोक्याच्या वर अंतरावर ठेवून झोपावे. हाताच्या खाली उशी ठेवून झोपल्यास आराम पडू शकतो. ३ ते ९ महिन्यांपर्यंतचा काळ हा फ्रिजिंग काळ मानला जातो. या दरम्यान फिजिओथेरेपी घेऊ नये. वेदना वाढल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने वेदनाशामक गोळ्या किंवा इंजेक्शन घ्यावेत. सहा महिन्यांनंतर शोल्डर फ्रोजन पिरीयडमध्ये जातो. तेव्हा फिजिओथेरेपी घ्यावी. १० टक्के रुग्णांमध्ये रुग्णाची अवस्था गंभीर होऊ शकते. त्याचा परिणाम दैनंदिनीवर होतो आणि कामावरही त्याचा परिणाम होतो. अशा वेळी शस्त्रक्रियादेखील करता येऊ शकते. अनेकदा फ्रोजन शोल्डर आणि इतर वेदना यांची लक्षणे सारखीच भासतात. त्यामुळे तज्ज्ञांकडून तपासणी होणे आवश्यक असते. जेणेकरूनयोग्य कारणे ओळखता येतील. व्यायामही आहे उपचार- बंद असलेला घट्ट



डॉ.शितल रामप्रसाद राऊत
ईरा हॉस्पिटल घाटसावळी
९९२२०२७२४४

दरवाज्याचे हँडल चांगल्या असलेल्या हाताने धरावा आणि वेदना होणारा हात मागच्या बाजूला नेण्याचा प्रयत्न करावा. वेदना होणारा हात हळूहळू उचलावा. दुसरा हात पाठीच्या बाजूला न्यावा आणि टॉवेलच्या साहाय्याने वर खाली हलवण्याचा प्रयत्न करावा. वेदना होणारा हात दुसर्या खांद्याकडे घेऊन जाण्याचा प्रयत्न करावा. दुसर्या हाताने कोपर्याला आधार द्यावा. हाताला गोलाकार रिंग मध्ये फिरवावा एकदा डाव्या दिशेला व उजव्या दिशेला

# पदवी सोबतच छोटे छोटे तांत्रिक कौशल्य पूर्ण करा : राज्यमंत्री बोर्डीकर

## मराठा युवकांनी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा लाभ घ्यावा : नरेंद्र पाटील

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : विद्यार्थ्यांनी आपल्या पदवीचा अभ्यासक्रम करताना किंवा पदवी झाल्यानंतर कौशल्यपूर्ण एखादा अभ्यासक्रम पूर्ण करावा. ज्यामुळे त्यांना करिअर करणे आणि नोकरी मिळविणे शक्य होईल, अशी सूचना राज्याच्या सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केली.

भोकरच्या आमदार श्रीजया चव्हाण यांनी शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथे आयोजित केलेल्या युवा उमेदवार रोजगार मेळाव्यात श्रीमती बोर्डीकर उद्घाटक म्हणून त्या बोलत होत्या. नांदेड जिल्ह्यातील शंकरराव चव्हाण महाविद्यालय अर्धापूर येथे आयोजित या युवा उमेद रोजगार मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने युवक -युवती उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण होते. तर विशेष अतिथी म्हणून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, आ.श्रीजया चव्हाण, स्वामी रामानंद



तिर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर,जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, माजी आमदार अमर राजुरकर, माजी आमदार अमीता चव्हाण आदीं मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी बोलताना बोर्डीकर यांनी आजचे युग कौशल्याचे असून तुमच्या पदवीसोबतच तुम्हाला रोजगारासाठी आवश्यक असणारे कौशल्य प्राप्त असणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानानुसार व आवश्यकतेनुसार आपल्या अभ्यासक्रमांमध्ये बदल करावा लागणार आहे. जगात सध्या कौशल्याची मागणी आहे. त्यामुळे तुमच्याकडे फक्त पदवी असून चालणार नाही. तर जगाला हवे असणारे कौशल्यही लागणार आहे. त्यामुळे विद्यापीठांनी देखील अशा पद्धतीच्या कमी कालावधीच्या अभ्यासक्रमाची निर्मिती करून नव्या पिढीला कौशल्य प्राप्त करून द्यावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी आपल्या महामंडळामार्फत मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज परतावा योजना उपलब्ध आहे. म्हणजे थोडक्यात कुणबी मराठा समुदायातील युवकांनी त्यांना आवड असणा-्या क्षेत्रातील उद्योग व्यवसाय उभारावा. या उद्योग व्यवसायात उभारण्यासाठी त्यांना बँकेने जे कर्ज दिले आहेत. त्याचा परतावा सरकार करणार आहे. अत्यंत सोपी ही पद्धत आहे. त्यासाठी युवकांनी पुढे यावे ,असे आवाहन त्यांनी यावेळी केले. या योजनेअंतर्गत अनेकांच्या आयुष्यात परिवर्तन झाले आहे. नांदेडमध्ये ही मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आव्हान त्यांनी यावेळी उपस्थित युवकांना केले.माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी अध्यक्ष स्थानावरून बोलताना प्रत्येक काळाची एक गरज असते. श्रीजया चव्हाण यांनी निवडणुकीमध्ये युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या आवाहन केले होते. त्यानुसार त्यांनी आजचा रोजगार मेळावा घेतला आहे. शेकडो कंपन्या या ठिकाणी आल्या आहेत. हा उपक्रम आता पूर्ण जिल्ह्यामध्ये हळूहळू राबविल्या जाईल. याशिवाय नांदेड जिल्ह्यामध्ये मोठे उद्योग सुरू करण्यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार आहे. केवळ नांदेडच नव्हे तर मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात उद्योग व्यवसाय यावेत यासाठीचे आपले प्रयत्न असून त्यातून युवकांच्या हाताला काम मिळावे, हा उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जवळपास ४ हजारावर बेरोजगारांची नोंद झाली असल्याचे त्यांनी सांगितले.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू मनोहर चासकर यांनीही यावेळी संबोधित केले. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना छोट्या छोट्या नोकरी पासून सुरुवात करा. सुरुवात करणे महत्त्वाचे आहे. नंतर दिशा मिळत राहते असे स्पष्ट करून कोणत्याही क्षणी हार न मानण्याच्या आवाहन विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नरेंद्र चव्हाण यांनी केले. सूत्रसंचालन विश्वंधार देशमुख यांनी केले.

# जयभिम महोत्सव समितीची निवड बैठक



भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त साजरा होत असलेल्या बीड जयभीम महोत्सवाच्या नियोजनासाठी शनिवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक बीड शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सायं ६ वाजता होणार आहे. तरी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड यांनी केले आहे. या बैठकीमध्ये दरवर्षाप्रमाणे जमाखर्च सादर केला जाणार आहे. तसेच जयभीम महोत्सव २०२५ या वर्षाची समिती निश्चित केली जाणार आहे. तरी या महत्वपूर्ण बैठकीस बौध्द उपासक-उपासिका, सर्व बहूजन समाजातिल प्रतिष्ठित नेते, कार्यकर्ते, कर्मचारी, पेन्शनर, रिटायर कर्मचारी, विविध क्षेत्रातील सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे. दरम्यान बीडच्या जयभीम महोत्सवाने राज्याला एक आगळावेगळा आदर्श घालून दिला आहे. स्वबळावर साजरी होणारी बीडची डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती राज्यात राज्यात नावारूपाला आलेली आहे. दरवर्षी विविध सांस्कृतिक,परिवर्तनीय कार्यक्रम राबवून जयंतीचे आयोजन केले जाते. त्या अनुषंगाने २०२५ ची समिती निवड करण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती २०२४ यांनी दिली

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार २३ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



# बालाजी तांदळेंनी धनंजय देशमुखांचे आरोप फेटाळले

## धनंजय मुंडे अन् कराडचा निकटवर्तीय असल्याने माझ्यावर संशय

बीड : धनंजय मुंडे, वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे यांच्याशी संबंध आहेत म्हणून माझ्यावर संशय येत आहे. पण तुम्ही संपूर्ण समाजाकडे गुन्हेगार म्हणून पाहू शकत नाही ना. माझा जर प्रकरणाशी काही संबंध असता तर मी आरोपींना पकडून दिले असते का? माझा जर या प्रकरणात कुठेही सहभाग आढळला तर मला सहआरोपी करा, असे म्हणत बालाजी तांदळे यांनी संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्या आरोपांचे खंडन केल आहे. दरम्यान बालाजी तांदळे पुढे बोलताना म्हणाले की, माझ्या दारासमोर भागवत शेलार यांची गाडी उभी होती संतोष देशमुख यांचा पाठलाग करणारी गाडी माझ्या दारात उभी नव्हती. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर



पोलिसांसह आम्ही वाशीला गेलो तिथे २ आरोपींना अटक केली आणि त्यानंतर पुण्यात गेलो.

# जनमेजय प्राथमिक विद्यामंदिर येथे शिवाजी महाराजांची जयंती साजरी

बीड - शहरातील जनमेजय प्राथमिक विद्यामंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराजांची यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी विनोद धांडे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमेस पुष्पहार घालून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुमारी सालगुडे सिद्धीनी केले. स्वागत गीत जाधव अनुष्का पवार,प्रतीक्षा वाघे ,कोमल सालगुडे,सिद्धी यांनी गायले व आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले त्यानंतर शिवाजी महाराजांवरील गीत कुमारी आरकडे,श्रुती वाघे,कांचन काकडे,राणी तेजस्विनी, राऊत शिंदे,अनुष्का यांनी सादर करून केले त्यानंतर कुमारी सालगुडे सिद्धी हिने छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडा सादर केला या कार्यक्रमासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेमध्ये चिरंजीव समर्थ मिसळे हा होता तसेच राष्ट्रमाता माँ.साहेब जिजाऊ यांच्या वेशभूषेमध्ये कुमारी पवार जानवी ही होती यानंतर शाळेतील शिक्षिका श्रीमती मोरे मॅडम यांनी मुलांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यामधील विविध



घटना सांगून मुलांनी त्याप्रमाणे त्यांच्या आयुष्यामध्ये योग्य प्रकारे अनुकरण करून आपले जीवन व्यतीत केले पाहिजे असे सांगितले त्यानंतर शाळेतील बऱ्याच मुलांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आपल्या मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमा वेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुपेकर सर यांनी त्यांच्या भाषणामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कशाप्रकारे सर्व मावळे एकत्र केले व आपले स्वराज्य स्थापन केले याविषयी माहिती सांगितली या सर्व कार्यक्रमाची तयारी व सादरीकरण कांडेकर मॅडम व पवार मॅडम यांनी केली या कार्यक्रमासाठी अनेक पालक उपस्थित होते तसेच शाळेतील शिक्षक श्री.शिंदे सर चोरमले सर, गोरख शिंदे सर ज्ञानेश्वर सिंघन,श्रीमती धांडे,मॅडम मोरे मॅडम,भोले मॅडम, कांडेकर मॅडम,पवार मॅडम हे सर्व उपस्थित होते. मोठे उत्सव वातावरणामध्ये जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# सुरेश धसांनी घेतली संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट

केज : संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात आहे. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक होणे गरजेचे असून त्यांना फरार करणाऱ्यावरही कारवाई झाली पाहिजे. ग्रामस्थांच्या आठ मागण्या मान्य झाल्या तर त्यांना आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असे भाजप आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे. सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, पंकज कुमावत यांना बीडचे ॲडिशनल एसपी म्हणून नियुक्त केले पाहिजे. तर पोलिसांचे हेड बदलले तर पोलिसही बदलावे अशी मागणी



त्यांनी मस्साजोगमध्ये देशमुख कुटुंबियांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना केली आहे. सुरेश धस म्हणाले की, आरोपींना जेलमध्ये व्हीआयपी ट्रिटमेंट मिळेत आहे, याचे सर्व पुरावे आहेत, असा आरोपही त्यांनी यावेळी बोलताना केला आहे. हे प्रकरण १०० टक्के जलदगती न्यायालयात चालणार असेही त्यांनी म्हटले आहे. एसआयटीमध्ये दोन सायबर तज्ञ असायला हवे अशी मागणी मी केली आहे. सुरेश धस म्हणाले की, महाजन आणि राजेश पाटील यांच्यावर सहआरोपी म्हणून कारवाई करण्यात यावी. कृष्णा आंधळे याला अटक झाली पाहिजे. कारण त्यांचे बगलबच्चे जर ३०७ सारखा गुन्हा करत आहे. आरोपी जेव्हा कोर्टात तारखेसाठी येत आहे

# धम्मभूमी मौजे शिवणी येथे माता रमाई जयंती संपन्न



बीड प्रतिनिधी- प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने धम्मभूमी मौजे शिवणी येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती उत्साहात संपन्न करण्यात आली. याप्रसंगी पूज्य भिक्ख महाविरो थेरो काळेगाव अहमदपूर यांच्या हस्ते तथागताच्या प्रतिमेस तर प्रमुख अतिथी प्रा.डॉ. भारती फुलेकर यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यागमूर्ती माता रमाई यांच्या यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सामुदायिक त्रिशरण पंचशील ग्रहण केल्यानंतर पूज्य भिक्खु महाविरो थेरो यांनी आपल्या धम्मदेशेत माघ पौर्णिमेच्या दिवशी तथागताच्या जीवनात घडलेल्या घटनेबद्दल सविस्तर माहिती दिली. सध्याच्या इंटरनेट,मोबाईलच्या जमान्यात माणूस माणसापासून दूर जात आहे.

# भाजपामध्ये सहभागी झालेले माझे सर्व नवीन सहकारी सदस्यांचे आभार - संभाजी सुर्वे



बीड । प्रतिनिधी सध्या देशभरात भाजपा सदस्य नोंदणी चालु असून महाराष्ट्राने या सदस्य नोंदणी मध्ये अद्वितीय यश प्राप्त केले आहे. या मध्ये बीड जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्ते संभाजी सुर्वे देखील अग्रेसर आहेत. त्यांनी पार्टीने दिलेले लक्ष पुर्ण करत एक हजार सदस्य पूर्ण करत भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून शाबासकीची पाट थोपटाऊन घेतली आहे. यावेळ संभाजी सुर्वे म्हणाले की, हे लक्ष मी पार करत असताना बीड मतदार संघातील नागरिक हे मोठया उत्साहाने भाजपच्या या सदस्य नोंदणीच्या महाकुंभात सहभागी होत गेले. त्या सर्वांचा मी व भारतीय जनता पार्टी बीड आभारी आहे. भाजपा मध्ये सहभागी झालेल्या सर्व नूतन सदस्यांना पुढील समृद्धी जीवनासाठी शुभेच्छा व नूतन झालेल्या सर्व सदस्यांच्या हातून राष्ट्र सेवा घडावी ही सदिच्छा या वेळी बीड भाजपा नेते संभाजी सुर्वे यांनी व्यक्त केलीआहे

# आरटीओ कार्यालयात एजंट लाच घेताना रंगेहात पकडला

बीड । प्रतिनिधी उप प्रादेशिक वाहन कार्यालयात विविध कामासाठी येणाऱ्या वाहनधारकांची सर्रास लूट होत असल्याच्या अनेक तक्रारी आहेत.या कार्यालयात येणाऱ्या वाहनधारका कडून खाजगी एजंट मार्फत पैशाची मागणी केली जाते. दुचाकी,तीन चाकी,चार चाकी सह सर्व वाहनाचे वेगवेगळे रेट कार्ड ठरलेले आहेत.तसेच वाहन परवाना,वाहन नूतनीकरण, फिटनेस, रिव्हॅलिड, बॅक लॉक यासह विविध कामासाठी उप प्रादेशिक वाहन कार्यालयात येणाऱ्या नागरिका पैसे दिल्याशिवाय कामच होत नसून फिटनेस(योग्यता) सर्टिफिकेट साठी तर वाहनधारकांनी पैसे दिले नाही तर त्यामध्ये अनेक त्रुटी काढतात जसे की इंडिकेटर, वायपर, ब्रेक लाईट,हॅन्ड ब्रेक बंद, वाहनाचे टायर, वाहनाला रेडियम कमी, वाहनावर कॅरियर असणे यासह अनेक त्रुटी काढून वाहनधारकांकडून प्रत्येक त्रुटीस १००० रुपये दर आकारला जातो. या पैशाची उपप्रादेशिक वाहन कार्यालयाकडून कोणतीही पावती दिली जात नाही.

# रोटरी साहित्य उपक्रमांतर्गत यशवंत विद्यालयला टीव्ही संच भेट

प्रतिनिधी रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या पुढाकाराने डिस्ट्रिक्ट गव्हर्नर नॉमिनी रो जयेश पटेल यांच्या मेमर्स पी पी पटेल अँड कंपनी आणि रोटरी फाउंडेशन च्या अर्थसहाय्याने व रोटरी क्लब ऑफ बीडच्या उपक्रमांतर्गत बीड शहरातील यशवंत विद्यालय या शाळेला टीव्ही संच भेट देण्यात आला शैक्षणिक साहित्यांतर्गत विद्यार्थ्यांना आकलन क्षमता वाढावी व शिक्षण अधिक सुलभ होऊन अभ्यासाची गोडी निर्माण करण्याच्या उद्देशाने या टीव्ही संचाची अभ्यासक्रमाची डिझाइनिंग करण्यात आली आहे डिजिटल क्लासरूमच्या माध्यमातून गरजू शाळांना आपल्या अध्यापनाचा दर्जा उंचावण्यासाठी रोटरीने हा उपक्रम हाती घेतला आहे येत्या पाच वर्षात प्रतिवर्षी जिल्ह्यातील १०० शाळांना आशा डिजिटल रूम तयार करण्यासाठी रोटरी मदत करणार आहे बीड शहरातील यशवंत विद्यालय या शाळेत पहिल्या उपक्रमात अंतर्गत हा टीव्ही संच भेट देऊन त्यामध्ये पहिली ते दहावीचा अभ्यासक्रम इन्स्टॉल करण्यात आला आहे यावेळी सोलापूर रो. अतुल चव्हाण रो. महेश साळुंखे रो. उदय शिंदे बीड रो. अध्यक्ष नितीन गोपन सचिव रो. डॉक्टर निलेश जगदाळे प्रमुख पाहुणे म्हणून रो. योगेश मुळे असिस्टंट गव्हर्नर, रो. गणेश वाघ क्लब ट्रेनर, रो. प्रमोद सावंत संभाजीनगर रो. आदेश नहार रो. सुरेश बुद्धदेव रो. संजय गुप्ता रो. आदेश नहार तसेच यशवंत विद्यालयातील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते यावेळी या महत्त्वाच्या उपक्रमाला आर्थिक सहाय्य करणाऱ्या पी पी फाउंडेशन चे बीड रोटरीने विशेष आभार मानले

# छावा चित्रपट मोफत पाहण्यासाठी शिवसंग्राम भवन येथे नाव नोंदणी करा

### अशी करावी नोंदणी


१)हा चित्रपट मोफत पाहण्यासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. यामध्ये महिलांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र शोचे आयोजन करण्यात आले आहे. २)यासाठी महिलांनी प्रत्यक्षात स्वतः शिवसंग्राम भवन येथे येऊन नाव नोंदणी करावी त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी नाव नोंदणी करतेवेळी आपल्या शाळेचे ओळखपत्र सोबत आणावे असे शिवसंग्रामच्या वतीने कळवण्यात आले आहे.

बीड । प्रतिनिधी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवसंग्राम च्या वतीने छत्रपती संभाजी महाराजांची यशोगाथा आणि जीवनपट जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्या करिता महिला आणि विद्यार्थ्यांसाठी ङ्घछावाङ्घ चित्रपटच्या मोफत शोचे आयोजन शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांच्या वतीने करण्यात आले आहे. हा चित्रपट मोफत पाहण्यासाठी दि. २३ फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी १० ते सायं ५ वाजेपर्यंत शिवसंग्राम भवन येथे नाव नोंदणी करावी असे आवाहन शिवसंग्रामच्या वतीने करण्यात आले आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या शौर्यगाथेवर आधारित छावा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धडाकेबाज कामगिरी करत आहे

# नांदेड येथे राज्यस्तरीय महसूल व क्रीडा सांस्कृतिक स्पर्धेत दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमाने पहिला दिवस गाजवला

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : गायन, अभिनय, दिग्दर्शन,वादन सर्वच क्षेत्रात एकापेक्षा एक दमदार सादरीकरणामुळे महसूलच्या सांस्कृतिक कार्यक्रमाला वेगळीच रंगत चढली आहे.महसूल विभागाने काल दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून सर्वांना थक्क केले.२१, २२ व २३ फेब्रुवारीला राज्यस्तरीय महसूल व क्रीडा सांस्कृतिक स्पर्धा नांदेड येथे होत आहे. १० ते १२ वर्षाच्या कालावधीनंतर होणा-या या स्पर्धांमध्ये सांस्कृतिक स्पर्धा देखील तेवढ्याच दर्जेदार होत असून काल नागपूर, कोकण,नाशिक





आणि जमाबंदी आयुक्त कार्यालयाच्या चमुने सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले.नागपूर विभागाने आदिवासी भागात लोकप्रिय असलेल्या रेला नृत्य सादर केले. वादन गायन या प्रकारातही नागपूरचे सादरीकरण अप्रतिम होते. कोकण विभागाने देखील अप्रतिम असे नाटक सादर केले. या नाटकामध्ये त्यांनी नृत्य, वादन ,गायन, सर्व प्रकार घेतले.सध्याची पिढी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या गर्तेत जगणे विसरून गेली आहे. अंतर्मुख झालेली पिढी मानसिक दृष्ट्या कमकुवत होत असल्याचे समाजातील कटू सत्य त्यांनी या नाट्यछटेतून व्यक्त केले. या सांस्कृतिक कार्यक्रमाला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,यापूर्वीचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, सातारा जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

काल दुपारी नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, यवतमाळचे जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिय,जालना जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ, हिंगोली जिल्हाधिकारी अभिनव गोयल, रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी विविध कार्यक्रमाला उपस्थिती लावली.जवळपास दोन हजाराच्या वर अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमांसाठी व क्रीडा स्पर्धांसाठी नांदेडमध्ये आले आहे रात्री उशिरापर्यंत चालणारे सांस्कृतिक कार्यक्रम हा एक या कर्मचा-यांसाठी गेट-टुगेदर सारखा कार्यक्रम असतो त्यामुळे यशवंत महाविद्यालयाच्या प्रांगणातील भव्य मंडप देखील अपुरा पळावा इतकी गर्दी या कार्यक्रमांना होत आहे.

शनिवारी सायंकाळी अमरावती, छत्रपती संभाजी नगर व पुणे विभागाचे सादरीकरण होणार आहे. रविवारी बक्षीस वितरणामध्ये अधिकृत विजेत्याची घोषणा केली जाणार आहे. पहिल्या दिवसाच्या सांस्कृतिक सोहळ्याचे उद्घाटन जथेदार गुरुद्वारा लंगर साहेबचे संत बाबा बलविंदर सिंग जी व सहआयुक्त राज्य वस्तू सेवा कर विभाग अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्यासह विविध विभागाच्या अधिका-यांच्या उपस्थितीत झाले.

# प्रधानमंत्री अवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरासाठीच खर्च करावा

## –जिल्हाधिकारी अविनाश पाठक

बीड दि. २२ :- घर म्हणजे आपल्या हक्काच असावे अशी प्रत्येक नागरिकाची इच्छा असते पण आपल्या कुवतीप्रमाणे प्रत्येकांचे घर घेण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही. स्वतःच्या घरात रमण्याचा आनंदच काही वेगळा असतो, कुंटूंबातील वाढत्या जबाबदा-या, मुला मुलींचे शिक्षण, लग्न इतर खर्चाने माणूस कोलमडून जातो अनब घर असावे घरासारखे हे स्वप्न सत्यात न उतरता नुसते स्वप्नच राहते, हक्काचा निवारा, घरकुल मिळवून देण्याचे काम प्रधानमंत्री अवास योजनेमूळे लाभार्थीचे स्वप्न साकार झाले असून प्रधानमंत्री आवास योजनेसाठी राज्य शासनाकडून मिळालेला पैसा घरातील गृहीणीने घरासाठीच खर्च करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात प्रधानमंत्री घरकुल अवास योजनेच्या ४० लाभार्थ्यांना घरकुल मंजूरीचे निधी वितरित प्रमाणपत्रा प्रसंगी



काढले.

जिल्हाधिकारी श्री. पाठक म्हणाले की, शासनाचा निधी ज्या गतीने मिळतो त्याच गतीने आपण स्वतः लक्ष घालून घरकुल पूर्ण करावे, आपल्या घराची वीट आपण स्वतःच रचावी, महिलांनी या पैशाचा उपयोग इतर खर्चासाठी न करता आपल्या जवळची जमा पुंजी घरासाठी वापरुन यंदाची दिवाळी आपण आपल्या हक्काच्या घरात साजरी करावी.या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने, जिल्हा परिषदेचे जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. उल्हास गंडाळ, पंचायतचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मोकाटे आणि संबधित अधिकारी, कर्मचारी, लाभार्थी उपस्थित होते. घरकुल योजनेसाठी उत्कृष्ट काम करणा-या कर्मचा-यांचा जिल्हाधिकारी यांनी गुलाब पुष्प देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व आभार प्रदर्शन जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका संगितादेवी पाटील यांनी केले. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना मग्रामीणफ (टप्पा - २) च्या अंतर्गत २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्राचे वितरण तसेच १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याचे वितरण कळ दाबून केले. हा कार्यक्रम पुणे येथून दुरदृश्य प्रणालीव्दारे प्रक्षेपित करण्यात आला.

# शिवाजी महाराज यांची जयंती डीजे वाजून नाहीतर पुस्तक वाटप करून साजरी केली शिवजयंती

बीड - बीड शहरातील मराठवाडा अभ्यासिका व केतुरा गावचे विद्यमान सरपंच. परमेश्वर नाना तळेकर व डॉ. आकाश तळेकर यांच्या संयुक्त विद्यमानाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक अनोखा सामाजिक उपक्रम राबवला आहे. डीजे वाजून नाही तर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त महापुरुषांची पुस्तक वाटप करून विद्यार्थ्यांच्या समवेत केली शिवजयंती साजरी. यावेळी जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे प्रस्ताविक युवा पत्रकार अंकुश गवळी यांनी केले, छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म १९ फेब्रुवारी १६३० रोजी महाराष्ट्रातील शिवनेरी येथील एका मराठा कुटुंबात झाला. शिवाजी महाराजांचे वडील शहाजी आणि आई जिजाबाई होते. आई जिजाबाई, स्वभावाने धार्मिक असूनही, तिच्या गुणांनी, स्वभावाने आणि वागण्यात एक धाडसी महिला होत्या. त्यांनी बाळ शिवाला रामायण, महाभारत आणि इतर भारतीय नायकांच्या गौरवशाली कथा सांगून आणि शिक्षण देऊन वाढवले सर्वगुण संपन्न माझ्या राजाने जगाला एक नवी दिशा दिली अखंड भारताचे आराध्य दैवत शिवराय यांची जयंती ही वैचारिक मंथन करणारी व्हावी यासाठी हा उपक्रम राबविला अस केतुरा गावचे सरपंच परमेश्वर तळेकर म्हणाले, या उपक्रमाची जिल्हाभरात खूप मोठ्या प्रमाणात चर्चा होत आहे, यावेळी मराठवाडा अभ्यासिकेचे विद्यार्थी व युवक खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होत

## एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब तर्फे आयोजित समीर काझी चषक बी.एफ.एल.चे थाटात उद्‌घाटन

बीड प्रतिनिधी - जिल्हा क्रीडा स्टेडियम येथे एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब तर्फे आयोजित समीर काझी चषक बी.एफ.एल. सीजन चार २०२५ चे थाटात उद्घाटन संपन्न झाले. यावेळी मान्यवरांची उपस्थिती होती. एस.के.पी. ग्रुप आणि शुजा स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या समीर काझी चषक बीएफएल सीजन चार २०२५ चे उद्घाटन उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे शहराध्यक्ष तथा उद्योगपती शेख निजाम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी एआयएमआयएम पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. शेख शफिक भाऊ, ॲड. सय्यद खाजा, प्रा. आमेर सलीम, अय्युब खान, जावेद काझी, शेख इम्रान यांची प्रमुख उपस्थिती होती. या चषकासाठी घेण्यात येणाऱ्या स्पर्धेमध्ये ६ संघांचा समावेश आहे. चषकातील सर्व सामने हे संध्याकाळी ०६:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत साखळी पद्धतीने खेळविण्यात येणार असून २३ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दररोज सामने रंगणार आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्याच्या इतिहासात प्रथमच रात्रीचे सामने आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी ५० हजाराचे प्रथम पारितोषिक एस.के. पी. ग्रुपचे सय्यद शाकेर यांच्या तर्फे तर रणवीर पंडित यांच्यातर्फे २५००० चे द्वितीय पारितोषिक देण्यात येणार आहे. सय्यद कय्युम जागीरदार यांच्याकडून पाच हजाराचा मालिकावीर पुरस्कार, किशोर कागदे यांच्यातर्फे उत्कृष्ट डिफेंडर दोन हजाराचे, आवेज इनामदार यांच्यातर्फे उत्कृष्ट गोलकीपर दोन हजाराचे, डॉ. इमरान खान यांच्यातर्फे उत्कृष्ट मिड फिल्डर दोन हजाराचे, जिल्हाध्यक्ष एस.डी. पी.आय.यांच्यातर्फे उत्कृष्ट फॉरवर्ड दोन हजाराचे पारितोषिके देण्यात येणार आहे. यासोबतच प्रत्येक सामन्यात सामनावीराचे सन्मान चिन्ह ॲड. सनाउल्लाह इनामदार यांच्यातर्फे देण्यात येणार आहे. या स्पर्धेचे संयोजन इमरान शेख, अफरोज सर, जमील सर, शेख एजाज, अब्दुल खदीर, इरशाद खान, इरफान बागे आणि शुजा स्पोर्टिंग क्लबचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मिळून केले आह

# परळीत गाडी अडवली, आंदोलकांनी दगड उचलले; सुरेश धसांचा संताप

भाजप आमदार सुरेश धस हे परळीच्या दऱ्यावर होते, यावेळी त्यांना आंदोलकांच्या रोषाला सामोर जावं लागलं. सुरेश धस हे परळीची बदनामी करत आहेत, असा आरोप करत त्यांच्याविरोधात आंदोलन करण्यात आलं. शिरसाळा गावात आमदार सुरेश धस यांना काळे झेंडे दाखवण्यात आले, तसेच जोरदार घोषणाबाजी देखील करण्यात आली, आता यावर सुरेश धस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.
नेमकं काय म्हणाले सुरेश धस?
लोकशाही मार्गाने काळे झेंडे दाखवण्याचा अधिकार आहे, तो त्यांनी करावा. मात्र पोलिसांसमोर दगड उचलण्याची मजल या लोकांची जाते. माजी पालकमंत्री असलेल्या नेत्याच्या भागातील आणि दुसऱ्या मंत्री असलेल्या नेत्याच्या भागातील हे लोक कसे वागतात. असं म्हणत त्यांनी यावेळी धनंजय मुंडे आणि पकंजा मुंडे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.



पुढे बोलताना ते म्हणाले की, मी पाच टर्म आमदार राहिलो आहे, एकदा राज्यमंत्री होतो तरीही माझ्या गाडीसमोर अशी पोरकट लक्षणं हे लोक करतात. हे दगड घेऊन मला मारणार होते का? ते दगड घेऊन मला मारणार नाहीत. मात्र आम्ही यांच्यासाठी काहीतरी करतो हे दाखवण्यासाठीची ही स्पर्धा आहे. मात्र ही गुंडगिरी, दहशत संपवण्यासाठी मी आता राजकारणात उतरलो आहे. शिरसाळ्यात जे मार्केट कमिटीने गाळे काढले ते गायरान जमिनीवर काढले. रस्त्यावर निषेध करायला जे लोक आले ते हे गाळेधारक असावेत किंवा बेकायदेशीर वीटभट्टीवाले असावेत, असं सुरेश धस यांनी म्हटलं आहे.
दरम्यान सुरेश धस यांनी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याची बातमी समोर आली होती. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चेला चांगलंच उधाण आलं. यावरून मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील सातत्यानं सुरेश धस यांच्यावर हल्लाबोल करत आहेत, मात्र दुसरीकडे सुरेश धस यांनी यावर प्रतिक्रिया देणं टाळलं आहे. मनोज जरांगे पाटील हे आमचे दैवत आहेत, मी त्यांच्यावर काहीही बोलणार नाही, असं धस यांनी म्हटलं आहे.

## उदरनिर्वाहासाठी लहानग्यांच्या जीवघेण्या कवायती ; डोंबारी खेळांकडे नागरिकांचे दुर्लक्ष ; बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेशः-( दि.२२ ) शिक्षणाचा गंध नसलेल्या डोंबारी समाजाची कथा आणि व्यथा वेगळीच असल्याने या समाजातील लहानग्यांना दोरी वर वेगवेगळी प्रात्यक्षिके करावयास लाऊन त्यातून मिळणा-या पैशातून कुटुंबाचा उदरनिर्वाह करावा लागतो. एकीकडे केंद्र आणि राज्य सरकार शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी विविध स्तरांवर प्रयत्न करत असल्याचे दाखवत असताना वास्तव वेगळेच असुन ५ ते १० वर्षाच्या कोवळ्या जिवांना जीवघेण्या कसरती करायला लाऊन त्यातून मिळणा०-या पैशांवर उदरनिर्वाह करत असल्याचे भयान वास्तव ग्रामीण भागात दिसून येते. शिक्षण, विकास आणि आधुनिकतेचा स्पर्श न झालेला हा डोंबारी समाज रस्त्याच्या कडेला तसेच बाजारपेठेत पारंपरिक डोंबारी कला सादर करत नाच व खेळ याच संगम साधत टीचभर पोटाची खळगी भरण्यासाठी लोकांसमोर कला सादर करून मिळालेल्या उदरनिर्वाह करीत आहेत.




**डोंबारी खेळांकडे नागरीकांचे दुर्लक्ष ; खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही झाले कमी**

पुर्वी डोंबा-याचा खेळ आला की खेळ पहायला गाव जमा व्हायचे. विविध साहसी खेळ दाखवले जायचे.खेळ झाल्यावर जमलेले बघे लोक १०,२०,५० रूपये द्यायचे परंतु आता खेळ बघणारे डोळे आणि देणारे हातही कमी झाले आहेत. कधी २०० तर कधी नशिबाने ५०० रुपये मिळतात. या खेळातुन पुर्वी चांगली बिदागी मिळत होती व यावर कुटुंबाची उपजीविका चांगली चालत होती.परंतु आजकाल खेळ पाहण्यासाठी लोकांकडे वेळ नाही.गावच्या वेशी जवळ अथवा रोडलगत खेळ सुरू केला तर लोक नजर टाकुन पुढे निघून जातात. त्यामुळे सध्या उपजिविकेचा व्यवसाय अडचणीत आल्याची खंत नागपुरचे रामलाल यांनी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्याशी लिंबागणेश येथे खेळ सादर केल्यानंतर संवाद साधताना बोलावून दाखवली.

## माजलगावच्या जयहिंद मित्रमंडळाच्या वतीने शिवजन्मोत्सव साजरा




शहरातील जयहिंद मित्र मंडळाच्या वतीने शिवजयंती साजरी करण्यात आली. यात दि. १८ रोजी संतोष महाराज आढावणे भोकरदनकर यांचे रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन झाले. यावेळी महिला, पुरूष भाविकांची मोठी उपस्थिती होती. दि. १९ फेब्रुवारीला शिवप्रतीमा पुजन व विवीध क्षेत्रातील गुणवंत/समाजसेवकांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी माजी आमदार मोहनराव सोळंके हे तर डॉ. प्रकाश आनंदगांवकर, सभापती जयदत्त नरवडे, शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, नवनाथ धाईजे, राजेश घोडे यांची उपस्थिती होती. यावेळी एमपीएससी परिक्षेत उत्तीर्ण व्ही. भी. दहीवाळ, नृतकलाकार वैभवी टाकणखार, समाजसेवक रामनवाजी जालनेकर यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक अच्युत लाटे यांनी केले तर मोहनराव सोळंके, डॉ. आनंदगांवकर यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की, जयहिंद मित्र मंडळ हे नेहमीच गुणवंतांचे सत्कार करण्यात अग्रेसर आहे. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी असे उपक्रम महत्वाचे असल्याचे सांगीतले. सुत्रसंचालन ममता शेरकर यांनी केले. कार्यक्रमासाठी जयहिंद मित्र मंडळाचे अध्यक्ष किरण मोरे, उपाध्यक्ष दत्ता गिराम, सचिव मुकेश डहाळे, ओमकार पातके, निलेश कुटे, युवराज जोगडे, पंकज सुर्वे, विष्णू मुंदडा यांनी परिश्रम घेतले.

# बीड शहरातील श्री शिवाजी विद्यालयाच्या शाम घाडगे याने मिळवले सुवर्णपदक

बीड प्रतिनिधी शहरातील श्री नारायणगड शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री शिवाजी विद्यालयातील खेळाडू शाम विष्णू घाडगे याने राज्यस्तरीय तायक्कांदो चॅम्पियन स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे. पुणे येथील बालेवाडी क्रीडांगणामध्ये १४ ते १५ फेब्रुवारी दरम्यान पाचवी महाराष्ट्र राज्य खुली तायक्कांदो चॅम्पियन स्पर्धा पार पडली. या स्पर्धेमध्ये ३७ ते ४१ किलो वजनी गटात श्री शिवाजी विद्यालयाचा आठवीचा विद्यार्थी शाम विष्णू घाडगे याने सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावून त्याने १००० स्पर्धकातून प्रथम क्रमांक पटकावला. त्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्याला सुवर्णपदक बहाल करण्यात आले. शाम घाडगे याला शाळेतील क्रीडाशिक्षक सुधीर कोल्हे, सुजित गिराम, धनंजय मस्के यांनी मार्गदर्शन केले.शाम घाडगे यांच्या



यशाबद्दल संस्था सचिव दिनकररावजी कदम, पदाधिकारी ॲड.जगन्नाथराव औटे, शकुंतलाताई लोळगे, पवनराव चौरे, आसाराम सुर्वे, शितलताई कदम यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, उपमुख्याध्यापक राजकुमार कदम, उपप्राचार्य त्र्यंबक मातकर, पर्यवेक्षक रमेश सुपेकर,पर्यवेक्षक गिरीष चाळक यांच्यासह सर्व शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वागत केले आह

# वडवणी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुकाध्यक्ष होण्यासाठी कार्यकर्त्यांमध्ये रस्सीखेस. बैठकीला आले मेळाव्याचे स्वरूप.

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे– राजेंद्र मस्के

वडवणी प्रतिनिधी- शनिवार दिनांक २२ फेब्रुवारी रोजी वडवणी तालुक्याची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची बैठक बोलण्यात आली होती, या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार समारंभ कार्यक्रम माजी नगरसेवक महादेवराव जमाले पाटील यांनी आयोजित केला होता.
तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक बोलण्यात आली होती. या बैठकीला वडवणी तालुक्यातील कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते. या बैठकीला मेळाव्याचे स्वरूप आले होते, नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी जिल्हा कार्यकारणी बरखास्त केल्याने नवीन कार्यकारणी मध्ये आपल्याला स्थान मिळावे यासाठी वडवणी तालुकाध्यक्ष होण्यासाठी सहा-सात लोकांनी इच्छा व्यक्त केली आहे. या ठिकाणी बैठकीत तालुका अध्यक्ष पदासाठी आपल्याला मिळावं यासाठी लॉबिंग करताना कार्यकर्ते दिसून आले आहेत.
या बैठकीमध्ये राजेंद्र मस्के असे म्हणाले की बीड जिल्हा पुरोगामी विचाराचा जिल्हा आहे माननीय शरदचंद्रजी पवार साहेब यांना मानणारा मोठा वर्ग या जिल्ह्यामध्ये आहे. यामुळे पक्षाची सत्ता असो किंवा नसो कार्यकर्ते पवार साहेबांच्या सोबत असतात त्यामुळे तालुकाध्यक्ष होण्यासाठी अनेक कार्यकर्त्यांना संधी मिळण्याची अपेक्षा आहे,या सर्व अपेक्षा आपण पुढच्या कार्यकाळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये पूर्ण करणार असा विश्वास जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी व्यक्त केला आहे, तसेच या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष माजलगाव मतदारसंघाचे नेते मोहनदादा जगताप यांनी



आपल्या भावना व्यक्त करत असताना असे सांगितले की माझा पराभव हा अल्पमताने झाला आहे. माझ्यापेक्षा माझा पक्ष मोठा आहे ही ताकद शरदचंद्रजी पवार साहेबांचे आहे कार्यकर्त्यांनी निष्ठेने काम केले असते तर मी नक्कीच माजलगाव मतदार संघाचा आमदार म्हणून निवडून आलेलो दिसलो असतो .परंतु कार्यकर्त्यांनी पक्षाचे पदे घेऊन ज्या पक्षाने उमेदवार दिला आहे त्याच्या विरोधात काम केल्याचे दिसून आले आहेत. यामुळे आगामी काळात ही दुटप्पी धोरण असणारे कार्यकर्ते आता आपण खड्यासारखे बाजूला करणार आहोत. मला प्रामाणिकपणे व गरीब कार्यकर्त्यांनी साथ देण्याचे काम केले आहे अशा कार्यकर्त्यांना नक्कीच विसरणार नाही असे उद्गार मोहन जगताप यांनी बैठकीत काढले.
यावेळी सोमनाथराव माने, श्रीराम मुंडे, महादेवराव जमाले,सुरेश भोरे, रामेश्वर भाऊ ,प्रकाश जेधे, भास्कर उजगिरे, सुग्रीव मुंडे ,खलील पठाण, शेख अखिल भाई ,विशंभर सावंत, बापू घोलप, पठाण इम्रान, अश्विन शेळके, आत्माराम जमाले, डॉ महादेव जाधव, बाबुराव जाधव, शेख अशपाक भाई, बाबासाहेब राऊत, घाडगे सरपंच, जयदत्त खोटे, संभाजी मस्के, सुधाकर चव्हाण, पंकज धांडे, महेश सावंत, बाळासाहेब गात,राकेश बिराजदार, लालासाहेब पन्हाळे, सुरेश माने, शाम कोठुळे, सह आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com